पुण्यनगरी दि. 14.07.2023

पुण्यनगरी 14.07.2023

# नांदेड जिल्हयात गोवंशासंबधाने ६० गुन्हे दाखल करुन २३६ गोवंशाना दिले जीवनदान

## नांदेड पोलीस दलाची कामगिरी

**नांदेड/प्रतिनिधी**

जानेवारी,२००३ ते आजपर्यंत गोवंश तस्करीबाबत एकूण ६० गुन्हे दाखल करण्यात आले असून या गुन्ह्यातील १३५ आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत नांदेड पोलीसांनी २३६ गोवंशाना जीवदान दिले असून एकुण ४० लाख ८२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ५६ वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यात गोवंश तस्करी प्रकरणी गोवंशाच्या अवैध वाहतुकीस आळा घालण्यासाठी व गोवंशाची अवैध वाहतुक करणाऱ्या गुन्हेगारांना अटक करण्याबाबत पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी नांदेड जिल्ह्यातील पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना आदेशीत केले होते. त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदारांची पथके तयार करुन सूचना दिल्या होत्या.

नांदेड जिल्ह्यातील पोलीस ठाण्याच्या हद्दीत नांदेड जिल्ह्यात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ व प्राण्यांना क्रूरतेने वागविण्याचा प्रतिबंध -१९६० अधिनियामान्वये विविध ठिकाणी कारवाई करुन गुन्हेगारांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली.

पुण्यनगरी दि. 14.07.2023

पुण्यनगरी 14.07.23

# मटका चालकावर कारवाई

**नांदेड/प्रतिनिधी**

वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका चालविणाऱ्या दोघांवर कारवाई करण्यात आली असून बुधवारी सायंकाळी ५ वाजता महाराष्ट्र हॉटेलच्या बाजुला असलेल्या पिंपळाच्या झाडाखाली दोघेजण मटका घेत असल्याची माहिती स्थागुशाच्या पथकाला प्राप्त झाली. त्यानंतर परमेश्वर चव्हाण यांनी धाड टाकून आरोपी राजेश किशोर रोत्रे (रा. जुना मोंढा, नांदेड), कृष्णा विष्णुप्रसाद उपाध्याय (रा.जुना मोंढा, नांदेड)या दोघांना ताब्यात घेऊन ३३७० रुपये व मटक्याचे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात २७७/२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे बंद असल्याचे सांगण्यात येत होते.